**ठळक बातम्या**

- जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नाशिक फाटा-खेड कॉरिडॉरसह देशभरातल्या आठ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग कॉरिडॉर निर्मिती प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी

- मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

- सर्वोच्च न्यायालयाच्या लोक अदालतीमध्ये एक हजारापेक्षा जास्त खटले निकाली

**आणि**

- भारत आणि श्रीलंका यांच्यातला पहिला एकदिवसीय क्रिकेट सामना बरोबरीत

**<><><><><>**

जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं ३२व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. सरकार कृषी क्षेत्रात विविध सुधारणा करत असून यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान

सुधारण्याचा हेतू आहे, सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी कृषिक्षेत्र आहे, असं ते म्हणाले. तृणधान्यं, दूध, डाळी आणि मसाल्यांचं सर्वात जास्त उत्पादन भारतात होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशात रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात शाश्वत शेतीवर मोठा भर देण्यात आल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशात कृषिक्षेत्रातलं संशोधन आणि शिक्षणासाठी चांगलं वातावरण असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यंदा या परिषदेत सुमारे ७५ देशांच्या एक हजारापेक्षा जास्त प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. यावर्षीची परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन’ अशी आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीनं देशभरात ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या ९३६ किलोमीटर लांबीच्या ८ महत्त्वाच्या राष्ट्रीय जलदगती कॉरिडॉर प्रकल्पांच्या विकासाला काल मंजुरी दिली. यामुळे देशातली दळणवळण कार्यक्षमता सुधारेल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि देशभरातील रस्तेजोडणी वाढेल. यात महाराष्ट्रातल्या ३० किलोमीटर लांबीच्या आठ पदरी ‘नाशिक फाटा-खेड’ कॉरिडॉरचा समावेश आहे. हा कॉरिडॉर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि चाकण यांसारख्या प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडेल, यामुळे इथल्या आर्थिक विकासालाही गती मिळेल.

या निर्णयामुळे देशाच्या आर्थिक वृद्धीला चालना मिळेल आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रासह सहा राज्यांमधल्या ५६ हजार ८०० चौरस किलोमीटर पेक्षा जास्त परिसराला ‘पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवीन मसुदा अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं  जनतेकडून येत्या साठ दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या असून नागरिक esz-mef@nic.in या संकेत स्थळावर त्याची नोंद करू शकतात.

सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम आणि मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास, आदी कामांवर बंधनं येतील, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र निवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांची आज वर्षा निवासस्थानी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याचं आश्वासन दिलं. वरळी इथल्या पोलीस वसाहतीच्या समस्याही तत्काळ दूर करण्यासाठी आठ दिवसांच्या आत

कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली. बीडीडी चाळ पुनर्विकसित इमारतीत दुकानदारांना वाढीव जागा कशी देता येईल याबाबत नव्या इमारतींच्या आराखड्याचा विचार करून तसा प्रस्ताव तयार करावा, नव्या पुनर्विकसित इमारतींमध्ये वरिष्ठ नागरिकांना प्राधान्य द्यावं असंही त्यांनी म्हाडाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सांगितलं. कल्याण ते शिळ रस्त्यावर पलावा समोरचा पूल आणि कल्याण इथला पत्री पुल या जोड रस्त्यांचं कामही तातडीनं हाती घ्यावं, असे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><>**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आपल्या विरोधात केलेले आरोप खोटे असल्याचं राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस अधिकारी सचिन वाजे यांच्या आधारे नागपुरात सांगितलं. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना अटक करण्याचं प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यावर दबाव टाकला, असा आरोप अनिल देशमुख यांनी काही दिवसांपूर्वी केला होता.

दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी उच्च न्यायालयानं सचिन वाजे याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नोंदवलेलं निरीक्षण ध्यानात न घेताच आरोप केला आहे अशी प्रतिक्रिया अनिल देशमुख यांनी दिली आहे. आपल्या विरोधातल्या आरोपांवर स्पष्टीकरण देण्यासाठी सचिन वाजेसारख्या अपराधी व्यक्तीची मदत फडणवीस यांना का घ्यावी लागते? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांना राज्य घटनेचं महत्व पटवून देण्यासाठी राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १६३ तांत्रिक महाविद्यालयांमध्ये संविधान मंदिर उभारलं जाणार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं येत्या १५ ऑगस्ट रोजी एकत्रितपणे या संविधान मंदिरांचं उद्घाटन ऑनलाइन होणार असल्याची माहिती मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ इथं आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचं ७५ वं स्थापना वर्ष साजरं करण्यासाठी न्यायालयानं हाती घेतलेल्या विशेष लोक अदालत उपक्रमाचा आज अखेरचा दिवस आहे.

**<><><><><>**

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर **मुंबईत** आज पावसानं हजेरी लावली. मुंबई शहर आणि उपनगरात सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. रस्ते, रेल्वे वाहतूक मंदावली आहे. मध्य वैतरणा, मोडकसागर धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. मोडकसागर धरणातील विसर्ग आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**मुंबई आणि ठाणे** जिल्ह्याला हवामान विभागानं आज जोरदार पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. **रायगड, पुणे, रत्नागिरी आणि कोल्हापूर** जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी तर **सातारा जिल्ह्याला** अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे.

इगतपुरी घाटातल्या पावसामुळं कसारा आणि इगतपुरी रेल्वे स्थानकादरम्यान रुळांवर दरड कोसळल्यानं तीनपैकी एका अप मार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली आहे. अन्य दोन मार्गांवरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

**सांगली जिल्ह्यातल्या** कोयना धरणातून ५२ हजार १०० क्युसेक्स, वारणा धरणातून ११ हजार ५७५ क्युसेक्स तर अलमट्टी धरणातून ३ लाख क्युसेक्स विसर्ग सुरू असल्याचं जलसंपदा विभागानं कळवलं आहे. पाऊस आणि धरणातून विसर्ग यामुळे कृष्णा नदीची पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. सर्व यंत्रणा सतर्क असून नागरिकांनाही सतर्क राहण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

दरम्यान, मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेल्या **कोलाड रोहा** राज्य मार्गाला शुक्रवारी दिवसभर कोसळणाऱ्या पावसामुळे सायंकाळच्या सुमारास पाले खुर्द आणि अशोक नगर या दरम्यान मोठं भगदाड पडलं आहे.

**<><><><><>**

केरळ राज्यातल्या वायनाड जिल्ह्यातल्या भूस्खलन-ग्रस्त भागात लष्कराकडून मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरु आहे. लष्कर,

राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि इतर संस्थांचे कर्मचारी दुर्घटना स्थळी मृतदेह शोधण्यासाठी सहकार्य करत आहेत. राज्य सरकारच्या विनंतीनुसार, ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा तपास करण्यासाठी  एक झेव्हर रडार, चार रेको रडार आणि विशेष तज्ञ दिल्लीहून मागवण्यात येत असल्याचं लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. आज दिवसभर ढिगाऱ्याखाली गाडले गेलेले मृतदेह काढण्यावर तसंच अत्यावश्यक सेवा पूर्ववत करण्यावर भर दिला जाईल, असं लष्करानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

पुणे- बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था आणि त्यामुळे वाहनधारकांना होणारा त्रास याविषयी आक्रमक भूमिका घेत काँग्रेसनं आज पुणे ते कोल्हापूर मार्गावर चार ठिकाणच्या टोल नाक्यांवर आंदोलन केलं. या महामार्गाचं रुंदीकरणाचं काम सुरु आहे.

त्यातच रस्त्यावर अनेक  खड्डे पडल्यानं प्रवासाला दीडपट अधिक वेळ लागत आहे. रस्ते खराब असूनही टोल वसूल केला जात आहे. त्यामुळे रस्त्याचं काम पूर्ण होईपर्यंत टोल माफ व्हावा, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंका यांच्यात काल एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला झालेला पहिला सामना बरोबरीत सुटला. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं जोरावर निर्धारीत ५० षटकांमध्ये ८ बाद २३० धावा केल्या. विजयासाठी २३१ धावांचा पाठलाग करताना भारताचा

संपूर्ण संघ ४८व्या षटकात २३० धावांमध्येच माघारी परतला. कर्णधार रोहीत शर्मानं धडाकेबाज अर्धशतकी खेळी केली. तर श्रीलंकेच्या वानिनदू आणि चरिथ यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.

**//<><><><><>//**